शनिवार, १५ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १७९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग
खराब हवामानामुळेच बिपीन रावत यांचा मृत्यू/ २
कर्जतमध्ये लोखंडी प्लेट तुटल्याने बंधाऱ्यातील पाणी गेले वाहून/ ५
भारताविरुद्धची कसोटी मालिका दक्षिण आफ्रिकेने जिंकली/ ६

## रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयात सात जण कोरोना पॉझिटिव्ह



**अलिबाग :** शासकीय कार्यालयांमध्ये कोरोनाचे रुग्ण आढळण्यास सुरुवात झाली असून अलिबाग येथील पोलीस जिल्हा अधीक्षक कार्यालयातील सात जणांचा कोरोना चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. यात अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. मुंबईला लागून असलेल्या रायगड जिल्ह्यात कोरोनाचा प्रादूर्भाव झपाट्याने वाढत आहे. दिवसाला दीड ते दोन हजार नवीन रुग्ण आढळत आहेत. रुग्णवाढ रोखण्यासाठी प्रशासनातर्फे वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत, परंतु ती रोखण्यात यश आलेले दिसत नाही. आता सरकारी कार्यालयांमध्येही कोरोनाचा शिरकाव झाल्याचे पाहायला मिळत आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयात करण्यात आलेल्या चाचणीत सात जण पॉझिटिव्ह आढळले आहेत.

# उद्धव ठाकरेसाहेब, स्वेच्छामरण द्या!

### बडतर्फ एसटी कर्मचाऱ्यांची विनंती

### विलिनीकरणाच्या मुद्द्यावर ठाम



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या विलिनीकरणाच्या मागणीवर ठाम असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांनी राज्यभरात एसटी संप (दुखवटा) सुरूच ठेवला आहे. दुसरीकडे संपात सहभागी झालेल्या आणि वारंवार आवाहन करूनही मागे न हटणाऱ्या कर्मचाऱ्यांवर बडतर्फी अथवा निलंबनाची कारवाई केली जात आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली एसटी आगारातील कर्मचाऱ्यांवरही बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन देऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे स्वेच्छामरणाची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी केली आहे, तसेच अधिकारी घरी येऊन दबाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचाही गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

एसटी महामंडळाच्या विलिनीकरणाच्या मागणीवर कर्मचारी ठाम आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला संप त्यामुळे अद्याप सुरूच आहे. कर्मचाऱ्यांनी कामावर हजर राहावे, निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांनी पुन्हा रूजू व्हावे, असे आवाहन महामंडळाकडून करण्यात येत आहे, मात्र काही कर्मचारी कामावर रुजू होण्यास तयार नाहीत. त्यामुळे महामंडळाने त्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारलेला आहे. आतापर्यंत शेकडो कर्मचाऱ्यांना निलंबित आणि सेवेतून बडतर्फ केले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली एसटी आगारातील कर्मचाऱ्यांवरही बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे. आता या बडतर्फ कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे स्वेच्छामरणाची परवानगी मागितली आहे. काही अधिकारी आमच्या घरी येऊन दबाव टाकत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

दापोली एसटी आगारातील ६० कर्मचाऱ्यांनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. या निवेदनाद्वारे त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे स्वेच्छामरणाची मागणी केली आहे. या कर्मचाऱ्यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनामुळे खळबळ उडाली आहे. ४१ टक्के पगारवाढ ही निव्वळ फसवी घोषणा असून सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सातवा वेतन आयोग आणि एसटीचे विलिनीकरण करण्यात यावे, अशा आमच्या प्रमुख मागण्या आहेत, असेही त्यांनी निवेदनाद्वारे सांगितले आहे.

गेल्या ६८ दिवसांपासून शांतपणे दुखवटा पाळत आहोत. प्रशासन मात्र कारवाई करीत आहे. काही अधिकारी तर कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन दबाव टाकत आहेत. कामावर आले नाहीत तर नोकरी जाऊ शकते, अशी भीती ते कुटुंबीयांना दाखवत आहेत. या प्रकाराकडे सरकारने लक्ष द्यावे. आम्ही आता स्वेच्छामरणाची परवानगी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागितली आहे. सध्या दिला जाणारा पगार पुरत नाही. जगण्यापेक्षा मेलेले बरे, अशी प्रतिक्रिया दापोली आगारातील बडतर्फ कर्मचारी मुनाफ राजापकर यांनी व्यक्त केली.

## 'अवकाळी'सह गारपिटीचा तडाखा

**नांदेड, भंडारा : प्रतिनिधी**

राज्यात पुन्हा एकदा काही ठिकाणी अवकाळी पावसासह गारपीट झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.

विदर्भ, मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. वादळी वाऱ्यामुळे काही भागात विद्युत पुरवठा खंडित आहे.

## उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी अन्य नेत्याकडे सोपवावी

### भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची मागणी



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्याला गेले ७० दिवस मुख्यमंत्री पूर्णवेळ उपलब्ध नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत गुरुवारी कोरोनासंदर्भात झालेल्या देशव्यापी बैठकीत मुख्यमंत्री व्हिडीओ कॉन्फरन्सलाही उपस्थित राहू शकले नाहीत. ते सलग दोन-अडीच तास एका जागी बसू शकत नाहीत, अशी माहिती राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी दिली आहे. त्यामुळे तब्येत बरी होईपर्यंत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अन्य नेत्याकडे मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी दिली पाहिजे, असे मत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी (दि. १४) पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

मुख्यमंत्र्यांनी पदभार दुसऱ्याकडे सोपविण्याची वेळ आली आहे का, असे विचारल्यावर पाटील म्हणाले की, राज्यात कोरोनाची तिसरी लाट आहे. अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. अशा वेळी निर्णय घेण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उपलब्ध नाहीत. **(पान २ वर..)**




**उलवे नोड : भाजपचे उलवे नोड उपाध्यक्ष विशाल म्हात्रे यांच्या सौजन्याने बांधण्यात आलेल्या साई सफायर बसथांब्याचे लोकार्पण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मधुकर खारकर, भाऊ पाटील, अमर म्हात्रे, निलेश खारकर, नंदकुमार ठाकूर, शैलेश भगत, धीरज ओवळेकर, नामदेव ठाकूर, कैलाश मिश्रा, कैलाश गोंधळी, प्रवीण ठाकूर, विश्वनाथ घरत, मदन पाटील, प्रणय कोळी, वैभव ठाकूर, सूरज घरत, सर्वेश म्हात्रे, चेतन घरत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## निवडक

### संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३१ जानेवारीपासून

**नवी दिल्ली :** यंदाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३१ जानेवारीपासून सुरू होणार असून ते दोन भागांत ८ एप्रिलपर्यंत चालणार आहे. पहिल्या भागात ३१ जानेवारी ते ११ फेब्रुवारीपर्यंत अधिवेशन असेल, तर दुसरा भाग हा १४ मार्च ते ८ एप्रिलपर्यंत असणार आहे. १ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता अर्थसंकल्प संसदेसमोर मांडण्यात येणार आहे.

### घातपाताचा कट उधळला; दिल्लीत स्फोटके केली निकामी

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील गाझीपूर येथील फुल बाजारात स्फोटकांनी भरलेली बॅग आढळली. याची माहिती मिळताच पोलिसांनी परिसर रिकामा करून बॉम्बनाशक पथकाला घटनास्थळी पाचारण केले. हे पथक आल्यानंतर त्यांनी जेसीबी मागवून एक खोल खड्डा खणून बॉम्ब निकामी केला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## पनवेल मनपा मागासवर्गीय कल्याण समितीची बैठक

### समाजाच्या उन्नतीसाठी विविध उपक्रमांबाबत चर्चा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मागासवर्गीय कल्याण समितीची बैठक शुक्रवारी (दि. १४) आयोजित करण्यात आली होती. महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात झालेल्या या बैठकीत मागासवर्गीय समाजाच्या कायमस्वरूपी उन्नतीसाठी विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षांमध्ये मागासवर्गीय कल्याण समितीची बैठक घेता आली नव्हती. त्यामुळे शुक्रवारी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, आरती नवघरे, एकनाथ गायकवाड, महादेव मधे, उपायुक्त तृप्ती सांडभोर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मागासवर्गीय समाजाच्या कायमस्वरूपी उन्नतीसाठी एखादा उपक्रम राबवला जावा, अशी मागणी करण्यात आली. ही मागणी मान्य करण्यात आली, तसेच नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर या ठिकाणी सिडकोकडून एक प्लॉट घेण्याचे ठरवण्यात आले. या प्लॉटवर इमारत उभारण्यात येणार असून या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी, तसेच महिलांसाठी स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या संदर्भात या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून विविध विकासकामे

### ■ आज मान्यवरांच्या हस्ते होणार शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत चौक येथे वैद्यकीय सामग्री व रुग्णवाहिकेचे लोकार्पण, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत मोहपे येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन शनिवारी (दि. १५) भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार देवेंद्र साटम, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे यांच्या हस्ते होणार आहे.

सकाळी १०.३० वाजता मोहपे येथील नळ पाणीपुरवठा योजनेचा भूमिपूजन समारंभ होणार आहे, तर सकाळी ११ वाजता चौक ग्रामीण रुग्णालयात ड्युरा सिलिंडर, जम्बो सिलिंडर, जनरेटर, मल्टीपॅरा मॉनिटर, सेल काऊंटर मशीन, या ३३ लाख ५० हजार रुपयांच्या वैद्यकीय सामग्रीचे, तसेच चौक ग्रामीण रुग्णालयाला देण्यात आलेल्या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा होणार आहे.

## डॉ. गिरीश गुणे यांना पितृशोक
## ज्येष्ठ डॉ. गोविंद गुणे यांचे निधन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील प्रख्यात डॉ. गिरीश गुणे यांचे वडील आणि ज्येष्ठ डॉ. गोविंद रंगनाथ गुणे यांचे गुरुवारी (दि. १३) सायंकाळी वृद्धत्वाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. कोरोना निर्बंध असल्याने अगदी मोजक्याच आप्तेष्टांच्या उपस्थितीत उत्तररात्री अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

रुग्णसेवा हा व्यवसाय नसून ती मनुष्यसेवा आहे हा विचार डॉ. गोविंद गुणे यांनी रूजविला. तोच संस्कार त्यांनी सुपुत्र डॉ. गिरीश गुणे यांनाही दिला. म्हणूनच डॉ. गुणे पिता-पुत्रांना गरीब रुग्णांचे देव म्हणून संबोधले जाते. डॉ. गोविंद गुणे यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३३ रोजी पंढरपूर येथे झाला. मुंबईतून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करीत त्यांनी डीएसएफ पदवी प्राप्त केली. १९५६ साली ते रायगडात आले. सुरुवातीची दोन वर्षे त्यांनी पेण तालुक्यातील वावोशी येथे सरकारी रुग्णालयात प्रॅक्टीस केली. त्यानंतर १९५८ ते २०१२पर्यंत पनवेलमध्ये त्यांनी गरीब, गरजू रुग्णांची सेवा केली. अत्यल्प शुल्क तेसुद्धा असल्यास द्यावे अशा वृत्तीने ते जनसेवा करीत असत.

रुग्णसेवेसोबतच रोटरी क्लबच्या माध्यमातून डॉ. गोविंद गुणे यांनी समाजसेवा केली. रायगड जिल्ह्यातील पहिले पीएचएफ डोनर म्हणून त्यांनी सन्मान मिळविला होता. ते रायगड मेडिकल असोसिएशनचे आजीव सभासद होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

डॉ. गोविंद गुणे यांच्या निधनाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शोक व्यक्त केला आहे.

दरम्यान, कोरोनाचा प्रादूर्भाव वाढत असल्याने आपण सर्वांनी निर्बंध पाळले पाहिजेत. त्यामुळे सांत्वनासाठी आमची व्यक्तिशः भेट घेणे टाळावे, असे आवाहन डॉ. गिरीश गुणे यांनी केले आहे.

## आठ आसनी चारचाकी वाहनांमध्ये सहा एअरबॅग अनिवार्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चारचाकी वाहनांमध्ये प्रवास करणाऱ्यांची सुरक्षितता वाढवण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी एक घोषणा केली आहे. आठ आसनी चारचाकी वाहनांमध्ये सहा एअरबॅग अनिवार्य करण्यात आल्याची माहिती ना. गडकरी यांनी शुक्रवारी (दि. १४) दिली.

आपल्या ट्विटमध्ये मंत्री गडकरी यांनी म्हटले आहे की, आठ आसनी चारचाकी वाहनांमध्ये किमान सहा एअरबॅग अनिवार्य करण्यात आल्या आहेत. हा जीएसआर अधिसूचनेचा मसुदा मंजूर करण्यात आला आहे. केंद्रीय वाहतूक मंत्रालयाने याआधीच एक जुलै २०१९पासून चालक एअरबॅग आणि १ जानेवारी २०२२पासून चालकासमोरील सह-प्रवासी एअरबॅगच्या फिटिंगची अंमलबजावणी अनिवार्य केली होती. चारचाकी गाडीमध्ये पुढील आणि मागील दोन्ही कंपार्टमेंटमध्ये बसलेल्या प्रवाशांना टकरांचा प्रभाव कमी करण्यासाठी एम १ वाहन श्रेणी म्हणजेच आठ आसनी वाहनामध्ये चार अतिरिक्त एअरबॅग अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



# खराब हवामानामुळेच रावत यांचा मृत्यू

## हेलिकॉप्टर अपघातासंदर्भात समितीचा प्राथमिक अहवाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या तिन्ही सैन्यदलांचे पहिले प्रमुख (सीडीएस) जनरल बिपीन रावत यांचा हेलिकॉप्टर अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. ८ डिसेंबर रोजी ही दुर्घटना घडली होती. या अपघातात एकूण १४ जणांचा मृत्यू झाला होता. या अपघातासंदर्भात संपूर्ण देशाला प्रश्न पडले होते की, हा अपघात नेमका झाला कसा आणि कशामुळे झाला? या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे.



या अपघाताच्या तपासाअंती समितीने दिलेल्या अहवालात म्हटलेय की, या संपूर्ण घटनेच्या पाठीमागे कसल्याही प्रकारचा कट होता किंवा कुठला तांत्रिक बिघाड हेलिकॉप्टरमध्ये होता वा कुठल्याही प्रकारचे दुर्लक्ष झाले होते, अशी कोणतीच बाब समोर आलेली नाहीये. तामिळनाडू राज्यातील खोऱ्यातील हवामानात अनपेक्षित बदल झाल्याने हेलिकॉप्टर ढगांमध्ये घुसल्याने हा अपघात झाल्याचे चौकशी पथकाने सांगितले आहे. अचानकपणे क्लायमेट बदलले आणि हेलिकॉप्टरचा मार्ग बदलला आणि ते पायलटच्या नियंत्रणात न राहता ढगामध्ये गेल्याने त्याचा मार्ग भटकल्याचा अहवाल समोर आला आहे. या समितीने सगळ्या बाबींची मदत घेऊन घटनेशी निगडित लोकांची साक्षही नोंदवली आहे. त्यातूनच हा अहवाल त्यांनी मांडला आहे. हेलिकॉप्टरमध्ये कुठल्याही प्रकारचा तांत्रिक बिघाड किंवा कटकारस्थान नसल्याची माहिती समोर आली आहे.

हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल व्हीआर चौधरी आणि एअर मार्शल मानवेंद्र सिंग यांच्या नेतृत्वाखालील त्रि-सेवा तपास पथकाचा हा अधिकृत निष्कर्ष आहे. या चौकशीत तपास पथकाने हेलिकॉप्टरचा फ्लाईट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपीट व्हॉईस रेकॉर्डरचाही अभ्यास केला. याशिवाय सर्व साक्षीदारांचे जबाबही घेण्यात आले. यातून या अपघाताचे कारण काय असू शकते याचा अंदाज घेण्यात आला. चौकशीत मेकॅनिकल फेल्युअर म्हणजेच यांत्रिक बिघाडाचा मुद्दा फेटाळण्यात आला आहे.



पनवेल : भाजपचे कार्यकर्ते आणि महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय यांचे पती अमर उपाध्याय यांना वकिलीची पदवी मिळाली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अमर उपाध्याय यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय आदी उपस्थित होते.



पनवेल : नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी २०२२ सालची दिनदर्शिका प्रकाशित केली असून या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी झाले. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, अमर उपाध्याय आदी उपस्थित होते.



उरण : भाजपच्या जसखार गाव अध्यक्षपदी निलेश घरत यांची आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत नियुक्ती करण्यात आली. या वेळी तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, जसखारचे सरपंच दामूशेठ घरत, भाजप नेते पी. जे. पाटील, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, रायगड जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष जसिम गॅस, तालुका उपाध्यक्ष मिलिंद पाटील, युवा मोर्चा शहर अध्यक्ष निलेश पाटील, युवा मोर्चाचे शेखर तांडेल, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील आदी उपस्थित होते.

# दफनभूमीतील दिवे त्वरित सुरू करावेत

## नगरसेविका नेत्रा पाटील यांची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

शहरातील से १४ मधील स्मशानभूमीअंतर्गत दफनभूमीतील लाईट बंद असल्याबाबत नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता (विद्युत मेट्रो) यांना निवेदन देऊन ती त्वरित सुरू करण्यासंदर्भात मागणी केली आहे.



खारघरमधील सेक्टर १४ येथील हिंदू स्मशानभूमीतील लहान मुलांच्या दफनभूमीत हायमास्ट आहे, पण त्या हायमास्ट पोलचे दोन लाईट बंद आहेत, तसेच त्या ठिकाणी असलेले दोन लाईटचे पोलदेखील बंद आहेत. त्यामुळे या ठिकाणी रात्री दफन करण्यासाठी आलेल्या प्रेताचा दफनविधी तेथील कर्मचाऱ्यांना अक्षरशः आपल्या मोबाइल बॅटरीच्या उजेडात करावा लागतो. परिसरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेता नगरसेविका नेत्रा पाटील यांनी त्वरित ते सिडकोचे कार्यकारी अभियंता ए. टी. गायधनकार यांच्या निदर्शनास आणून दिले. त्या ठिकाणी नादुरुस्त असलेले लाईट व पोल दोन्ही सुरू करण्यात यावे, अशी लेखी मागणी निवेदनाद्वारे त्यांनी केली. या ठिकाणी अंधार असल्याने साप, विंचू व इतर प्राण्यांची देखील भीती कर्मचारी व दफन करण्यासाठी येणाऱ्या नातेवाईकांना असते. भविष्यात काही अनुचित प्रकार घडण्याआधी आपण त्वरित योग्य त्या उपाय योजना कराव्यात, अशीही मागणी शेवटी नगरसेविका नेत्रा पाटील यांनी निवेदनात केली आहे.

## स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटनेच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील यांची जयंती

**पनवेल : वार्ताहर**

स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटनेच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या हस्ते लोकनेते दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.



पनवेलजवळ होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला त्यांचे नावच योग्य असून त्याला आमच्या पक्षाचा जाहीर पाठिंबा असल्याचे महेश साळुंखे यांनी सांगितले. या वेळी रिक्षा संघटनेचे प्रल्हाद ढमाले, अध्यक्ष नरेश परदेशी, उपाध्यक्ष दिलीप नाईक, प्रवीण धुमाळ, मयूर परदेशी, शशिकांत भुई, पाटील आदींसह अनेक जण उपस्थित होते.



## द आर्ट ऑफ लिव्हिंग सेंटरचे पनवेलमध्ये उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

द आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या पनवेलमधील सेंटरचे महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १४) उद्घाटन झाले. हे सेंटर पनवेलमध्ये सुरू करण्यासाठी माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर यांनी सातत्याने प्रयत्न केले होते.

आर्ट ऑफ लिव्हिंग ही एक शैक्षणिक व मानवहितकारी चळवळ आहे, जी तणावमुक्ती आणि सेवा उपक्रमांमध्ये अविरत कार्यरत आहे. ही संस्था जागतिक स्तरावर कार्यरत असून लोकांच्या आयुष्यात बदल घटवण्याचे मोठे काम या संस्थेमार्फत सुरू आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या चळवळीने सर्व सामाजिक स्तरांमध्ये सेवा कार्याच्या माध्यमातून शांतता पसरवली आहे. या संस्थेचे पनवेलमधील सिद्धांत मार्केटमध्ये सेंटर सुरू झाले आहे. या वेळी स्वप्नील मोहन कल्याणकर, वेंकटेश रामकृष्ण, श्रीमती सुनीता जी, हनुमंत शिंदे, माधुरी गोसावी आदी उपस्थित होते.

# कळंबोलीतील समस्यांवर उपाययोजना करा

## सभागृह नेते परेश ठाकूर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथे विविध नागरी समस्या नागरिकांना भेडसावत आहेत. त्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत महापलिका मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी परेश ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात लवकरात लवकर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

कळंबोलीमधील नागरिकांना रस्ते, गटार, ड्रेनेज, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांटड आणि फूटपाथच्या समस्या भेडसावत आहेत. त्याबद्दल सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना या समस्यांबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीला स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, प्रभाग समिती ब सभापती प्रमिला पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, नगरसेवक अमर पाटील, उपायुक्त सचिन पवार, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील उपस्थित होते.



# उरण शिक्षक पतपेढी अध्यक्षपदी राजश्री मोकल



**कळंबोली : बातमीदार**

उरण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीच्या अध्यक्षपदी राजश्री राजेंद्र मोकल यांची निवड झाली आहे. नुकत्याच झालेल्या पतपेढीच्या पंचवार्षिक निवडणुकीत स्वाभिमानी शिक्षक मित्र पॅनेलचे १५ उमेदवार बहुमताने विजयी झाले.

याचबरोबर उपाध्यक्षपदी अविनाश गणा कोळी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांचा संस्थेच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

नवीन कार्यकारी मंडळामध्ये नवनीत गावंड, प्रभाकर घरत, दीपक घरत, प्रशांत पाटील, मंदार रसाळ, संजय पाटील, नितीन कुडावकर, केसरीनाथ दरे, रमणिक म्हात्रे, संदीप पाटील, स्वाती गायकवाड, शर्मिला गावंड, धनश्री पाटील यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमात स्वाभिमानी शिक्षक पॅनेलचे सुभाष भोपी, जयदास घरत, नरेश मोकाशी, गंगाधर पाटील, निर्भय म्हात्रे, बबन पाटील, राजेंद्र मोकल, महेंद्र गावंड, संदीप जुईकर, बळीराम पाटील, के. आर. म्हात्रे, राजेंद्र शिंदे, प्रितम वर्तक, विश्वनाथ पाटील, भरत पाटील, रवींद्र कोळी, नितीन गायकवाड, संजय सावळे, सविता कोळी आदींनी नवनियुक्त पदाधिकारी व संचालक मंडळ यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन कविता गावंड यांनी केले.

# गणेश नाईक यांच्या आमदार निधीतून राजमाता जिजाऊ रुग्णालयाला ऑक्सिजन प्लान्ट

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली सेक्टर ३ येथील नवी मुंबई पालिकेच्या राजमाता जिजाऊ रुग्णालयात ऑक्सिजन प्लान्टचे उद्घाटन आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते झाले. ऐरोली, दिघा, रबाळे नोड, गावठाण, झोपडपट्टी परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना यापुढे फायदा होणार आहे. या ऑक्सिजन प्लान्टसाठी आमदार गणेश नाईक यांनी एक कोटी आमदार निधी दिला होता.



राजमाता जिजाऊ रुग्णालय आता ऑक्सिजन पुरवठ्यात स्वयंपूर्ण बनले आहे. केवळ कोविड काळातच नव्हे तर कायम ऑक्सिजन पुरवठ्याची सुविधा नवी मुंबईकरांना उपलब्ध झाली आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत नवी मुंबईत ऑक्सिजनची कमतरता भासली होती. त्या वेळी पालिकेला खाजगी कंपन्यांवर अवलंबून राहावे लागले होते. अगदी आपल्या वाट्याचा प्राणवायू कोणती दुसरी पालिका चोरून तर नेणार नाही ना यासाठी रात्रभर पालिकेचे अधिकारी रखवालदारी करत होते. त्या वेळी पालिकेने स्वतःचा प्लान्ट उभारून स्वावलंबी होण्यासाठी पाऊल उचलले. त्यानुसार आमदार गणेश नाईक यांनी ऐरोली रुग्णालयात प्लान्ट उभारण्यासाठी एक कोटी आमदार निधी दिला होता. त्यानुसार पालिकेने आमदार निधी व स्वतःच्या निधीचा वापर करत पीएसए तंत्रज्ञानावर आधारित १००० एलपीएम क्षमतेचा हा ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभा राहिला आहे.

कोरोना नियमांचे पालन करीत झालेल्या या कार्यक्रमास आमदार संदीप नाईक, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी सभापती अनंत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी सभापती डॉ. जयाजी नाथ, माजी नगरसेवक अशोक पाटील, माजी परिवहन समिती सभापती अ‍ॅड. जब्बार खान, पालिकेचे शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त बाबासाहेब राजळे आदी उपस्थित होते.

## उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी अन्य नेत्याकडे सोपवावी

पान १ वरून

संकटाच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी स्वतः पुढाकार घेऊन काम करणे अपेक्षित आहे. त्यांच्या वतीने कोणी मुख्यमंत्री म्हणून काम करावे हे ठरविण्याचा त्यांचा अधिकार आहे. आपण मुख्यमंत्र्यांची तब्येत लवकरात लवकर बरी व्हावी यासाठी देवाकडे प्रार्थना करतो, पण तब्येत बरी होईपर्यंत त्यांनी अन्य नेत्याकडे पदभार सोपवावा.

महाराष्ट्रातील परिस्थिती देशात चांगली आहे, असा दावा शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केल्याचे एका पत्रकाराने सांगितले असता, चंद्रकांत पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री एकदाही मंत्रालयात आले नाहीत. ते गेले ७० दिवस कोणालाही उपलब्ध नाहीत. एसटीचा संप चालू असून ७०पेक्षा जास्त एसटी कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. सरकारी भरतीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटत आहेत. निराशेमुळे तरुणांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्ता नाही. त्यांना विमा मिळत नाही आणि नुकसानभरपाईही मिळत नाही. असे असूनही महाराष्ट्राची परिस्थिती चांगली आहे, असे संजय राऊत यांना वाटत असेल तर ठीक आहे.

नशिबाने काल-परवा प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या संजय राऊतांसारख्या नेत्याने आपल्या दृष्टीची चिंता करू नये. ती तपासायला भाजपचे नेतृत्व समर्थ आहे, पण राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत चेअरमनपद मिळवले, मात्र उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेनेचा उमेदवार कसा पडला हे त्या पक्षाला समजत नाही. तुम्हाला पूर्णपणे संपविण्याचा डाव चालू असून त्यात तुम्ही फसत चालला आहात. त्याची आधी चिंता करा, असा टोला त्यांनी हाणला.

## महाबळेश्वरमध्ये पारा शून्य अंशांवर

**महाबळेश्वर** : राज्याच्या बहुतांश भागात गेल्या तीन दिवसांपासून थंडीचा कडाका कायम आहे. त्यातच राज्यातील थंड हवेचे ठिकाण असणाऱ्या महाबळेश्वर आणि पाचगणीमध्ये तर पारा शून्य अंशांवर पोहचला आहे. महाबळेश्वरमधील वेण्णा तलाव आणि लिंगमळा भागामध्ये शुक्रवारी (दि. १४) पहाटे तापमान शून्य अंशांपर्यंत खाली आल्याचे पाहायला मिळाले.

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांनी नवी मुंबईत साकारणार महाराष्ट्र भवन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई वाशी येथे महाराष्ट्र भवन उभारण्याचा गेली अनेक वर्षे रखडलेला प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. आमदार मंदा म्हात्रे यांनी गुरुवारी (दि. १३) उपमुख्यमंत्री अजित पवार यांची रखडलेल्या महाराष्ट्र भवन प्रश्नाविषयी भेट घेतली. त्या वेळी पवार यांनी भवन उभारणीस संमती दिली. बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या शासन दरबारी पाठपुराव्याला यश आले असून लवकरच नवी मुंबई वाशी येथे सुसज्ज अशी महाराष्ट्र भवनची वास्तू उभी राहणार आहे.

इतर जिल्ह्यांतून मुंबईत येणाऱ्या नागरिकांना, तरुणांना महाराष्ट्र भवनचा आधार मिळणार आहे. हे महाराष्ट्र भवन राज्य सरकार उभारणार असून सिडकोने भवन निर्मितीसाठी भूखंड रु. १ मात्र दराने देण्याबाबत प्रामुख्याने या बैठकीत चर्चा करण्यात आली. येत्या आठ दिवसांत नगरविकास मंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको एमडी, नवी मुंबई पालिका आयुक्त तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. या वेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे यांनाही निवेदन देण्यात आले असून त्यांच्याशीही फोनवर संपर्क साधून चर्चा करण्यात आली असून त्याबाबत नगरविकासमंत्री शिंदे यांनी सकारात्मकता दर्शवली आहे.

# कोविडमुळे कर्नाळा अभयारण्य बंद

## ▌पर्यटकांत नाराजी, स्थानिकांच्या रोजगारावर येणार गदा




**पनवेल : वार्ताहर**

कोविडच्या तिसऱ्या लाटेला सुरुवात झाल्याने राज्य सरकारने पुन्हा निर्बंध लागू केले आहेत. यातच पनवेलमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाणारे कर्नाळा अभयारण्यही पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या स्थानिक रोजगार व बचत गटातील महिलांच्या रोजगारावर गदा येणार आहे.

पनवेलमध्ये मोठ्या प्रमाणात कोरोना रुग्ण आढळत आहेत. ग्रामीण भाग तसेच पनवेल शहरात सध्याच्या घडीला १० हजारांपेक्षा जास्त सक्रिय रुग्ण आहेत. कर्नाळा अभयारण्य बंद ठेवण्यात आल्याने काही पर्यटकांचा हिरमोड झाला आहे. एकीकडे मॉल तसेच हॉटेल ५० टक्के उपस्थितीत सुरू असताना नैसर्गिक पर्यटन मात्र बंद ठेवण्यात आले आहे. कर्नाळा अभयारण्यात दररोज किमान ३०० पर्यटक येत असतात. सुटीच्या दिवशी ही संख्या ५००च्या वर जाते. या पर्यटकांमुळे स्थानिक बचत गटांना रोजगार मिळतो, मात्र ते बंद होणार असल्याने बचत गटातील महिलांच्या रोजगारावरही गदा येणार आहे.

*मुंबई-गोवा महामार्गावर पनवेलपासून अवघ्या १२ किलोमीटरवर हे कर्नाळा पक्षी अभयारण्य आहे. कर्नाळा किल्ला आणि आसपासचा परिसर पक्षी वैविध्याने संपन्न असल्यामुळे राज्य शासनाने हा परिसर राखीव वनक्षेत्र घोषित करून पक्षी अभयारण्याचा दर्जा दिला आहे. त्यामुळे दरवर्षी हजारो पर्यटक या ठिकाणाला भेट देतात. कर्नाळा अभयारण्यात ६४२ वृक्ष प्रजाती, वेली, वनौषधी आणि दुर्मिळ वनस्पती आहेत.*




## विविध नागरी कामांसंदर्भात मनपा आयुक्तांची अधिकाऱ्यांसोबत बैठक

**पनवेल : प्रतिनिधी**

तीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, माता बाल संगोपन केंद्र, क्रिकेट प्रशिक्षण केंद्र, सोलार पॅनेल, नित्यानंद रस्त्याचे रूंदीकरण, नव्याने बांधण्यात येणाऱ्या दोन स्मशानभूमी अशी सर्व कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने वेगाने कामास लागण्याच्या सूचना आयुक्तांनी गुरुवारी (दि. १३) झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

वाहतूक विभाग नव्याने सुरू करण्यासाठी त्या अंतर्गत येणारे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याच्या दृष्टीने संबधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. पनवेल शहर, तसेच महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी फेरीवाल्यांमुळे रस्त्यांवर होणारी गर्दी, वाहतुकीची समस्या कमी करण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर या वेळी चर्चा करण्यात आली. त्यानुसार कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी या वेळी दिले.

महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या माध्यामातून इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्याबाबतीत या वेळी चर्चा करण्यात आली. सुरुवातीस पूर्वप्राथमिक शाळा सुरू करणे, तसेच टप्प्याटप्प्याने पुढील वर्ग सुरू करण्यासाठीचे नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी शिक्षण विभागास दिल्या.

या वेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, लेखाधिकारी डॉ. संग्राम व्होरकाटे, तसेच सर्व विभागप्रमुख, खाते प्रमुख या बैठकीस उपस्थित होते.

## निवडक

### 'दिबां'च्या जयंती दिनी आरोग्यदायी उपक्रम

**नवी मुंबई :** आगरी-कोळी समाजाचे लढवय्ये नेतृत्व लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त ऐरोलीत महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष गणेश म्हात्रे यांच्या जनसंपर्क कार्यालयात गुरुवारी रक्तदान, आरोग्य व नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपट सेनेचे विशाल कदम, विभागाध्यक्ष प्रमोद मोरे, माथाडी कामगार सेनेचे नवी मुंबई चिटणीस राकेश पवार, विभागाध्यक्ष दिलीप शिर्के आदी उपस्थित होते. या वेळी ४० युनिट रक्त संकलित करण्यात आले, तसेच रक्तदात्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.



### चित्रपट 'अविरत'चे पोस्टर प्रकाशन

**उरण :** चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील कोंढरी येथील जय हनुमान कलामंच कोंढरीचे नृत्य दिग्दर्शक तथा कलाकार मिलिंद भाऊ म्हात्रे, राजेश पवार निर्मित आणि मिलिंद म्हात्रे लिखित व दिग्दर्शित आगामी अविरत हा मराठी चित्रपट येत आहे. या चित्रपटाच्या पोस्टरचे प्रकाशन नुकतेच कोंढरी गावच्या हनुमान मंदिरात मिलिंद म्हात्रेंच्या आई-वडीलांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी करंजा मच्छीमार सोसायटीचे माजी चेअरमन शिवदास नाखवा, निर्माते राजेश पवार, चाणजेचे सरपंच मंगेश थळी, ग्रामपंचायत सदस्य व संगीतकार विश्वास पाटील, कलाकार अरुण म्हात्रे, आकाश भोईर, सुरेश चव्हाण, हर्षवर्धन धामणकर, सोमनाथ ठाकूर, विनोद म्हात्रे, दीपा ठाकूर, विद्या ठाकूर, तसेच मिलिंद म्हात्रे, होळकर गुरुजी, चेतन पाटील आदी उपस्थित होते.



### 'दिबा' यांना काव्यमैफलीद्वारे अभिवादन

**चिरनेर :** लोकनेते दि. बा. पाटील यांना आचार्य अत्रे कट्टा, उरण व काव्य दरबार या साहित्य सेवाभावी संस्थांतर्फे काव्यमैफलीद्वारे अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आचार्य अत्रे कट्ट्याचे अध्यक्ष धनंजय गोंधळी यांनी दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाला रायगड भूषण नरेश म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी जे. एस. घरत, हरिभाऊ घरत, रा. उ. म्हात्रे, काशिनाथ मढवी यांनी दि. बा. पाटील यांच्या कार्याची माहिती सांगून अभिवादन केले. यानंतर प्रकाश ठाकूर, विराम उपाध्ये, हरचंदा माळी, हरिभाऊ घरत, काशिनाथ मढवी, भगवान ठाकूर, जे. एस. घरत, राजेंद्र नाईक, धनंजय गोंधळी, मेघनाथ म्हात्रे यांनी कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा. उ. म्हात्रे यांनी केले.

### पिरकोन येथील विद्यालयाला पंखे भेट



**उरण :** तालुक्यातील पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाला माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष कृष्णा पाटील व उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या सहकार्याने चार पंखे भेट देण्यात आले. प्रभाकर ठाकूर यांनी पंखे बसवण्याचे काम विनामूल्य करून दिले. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वेट मॅडम, भगत सर, एस. एन. पाटील, अे. अे. पाटील आदी उपस्थित होते. श्री. भगत यांनी शाळेच्या वतीने दहा गावे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष कृष्णा पाटील, उपाध्यक्ष मुकुंद गावंड, प्रभाकर ठाकूर यांचे आभार मानले.



## आपटा फाटा ते रसायनी रस्त्याच्या डागडुजीची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपटा फाटा ते रसायनी या मुंबई-गोवा महामार्गाला जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्याच्या डागडुजीची मागणी करण्यात येत आहे. गेली कित्येक वर्षे पाठपुरावा करूनही रस्त्याची डागडुजी करण्यात आलेली नाही.

या रस्त्यावर मोठमोठे खड्डे असल्याने दुचाकी वाहनांचे नेहमीच अपघात होत असतात. मागील १५ दिवसांत या ठिकाणी चार अपघात घडले. त्यामधील आपटा गावातील ग्रामस्थ विलास कदम यांच्या हाताला दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले आहे. नवीन प्रवाशांसाठी तर हा रस्ता म्हणजे मृत्यूचे दारच आहे. भविष्यात जर या खड्ड्यांमुळे अपघातात कोणी मृत्युमुखी पडले, तर सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदारी घेईल का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

## अपघातात दोघे जण ठार

**पनवेल :** एका अज्ञात वाहनाची धडक रिक्षाला बसल्याने झालेल्या अपघातात रिक्षाचालक व त्याच्या पाठीमागे बसलेला प्रवासी या दोघांचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पनवेलजवळ घडली. रिक्षाचालक अप्पू शेखप्पा अलूर (५३) हे प्रवाशाला घेऊन एक्स्प्रेस मार्गावरून बंदी असतानाही रिक्षा घेऊन जाताना अपघात झाला. अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**उलवे नोड : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयात स्व. तुकाराम नारायण घरत यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला कामगार नेते महेंद्र घरत, शुभांगी घरत, कुणाल घरत, विजय घरत, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, वामन म्हात्रे, रामदास ठाकूर, श्रीकांत घरत, सुधीर ठाकूर, प्रमोद कोळी, अनंता ठाकूर, योगिता भगत, विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, प्रभारी मुख्याध्यापिका प्रणिता वैद्य, पर्यवेक्षक अरुण जोशी, तसेच सर्व शिक्षक व इतर कर्मचारी यांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.**

## फुंडे हायस्कूलमध्ये 'दिबां'ची जयंती



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तु. ह. वाजेकर विद्यालयात गुरुवारी (दि. १३) लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू, प्राचार्य एम. एच. पाटील, उपमुख्याध्यापक व्ही. एल. नरवडे, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे व एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे, सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील, दर्शना माळी, डी. डी. पाटील, एस. टी. म्हात्रे, तसेच सर्व सेवकवृंद यांच्या हस्ते लोकनेते दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे चेअरमन कृष्णा कडू यांनी दि. बा. पाटील साहेब यांचा जीवनपट सांगताना त्यांनी शेतकरी आणि भूमिपुत्र यांच्यासाठी केलेल्या कार्याची माहिती सांगितली.

## गतिमंद मुलगी कुटुंबीयांकडे सुपूर्द

**पनवेल : वार्ताहर**

आपल्या नातेवाईकांकडे राहण्यास आलेली एक गतिमंद मुलगी घरचा रस्ता चुकल्याने फिरत असताना याबाबतची माहिती तालुका पोलिसांच्या पथकास मिळाली. त्यांनी तत्काळ या मुलीला ताब्यात घेऊन परिसरात शोध घेऊन तिला तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केल्याने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

मीलन राजाराम चोरगे (वय २९, वाकडी, पनवेल) यांना एक मुलगी वय वर्ष अंदाजे १३ ही वाकडी येथे फिरत असताना आढळली. त्यांनी तिला पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी तिच्या कुटुंबीयांचा शोध सुरू केला. दरम्यान, वाकडी गावाजवळ काही जण एका मुलीचा शोध घेताना आढळून आले. त्यांना पोलिसांनी मोबाइलमधील मुलीचा फोटो दाखविला असता हीच मुलगी हरवलेली असल्याचे सांगितले. त्यानंतर मुलीच्या नातेवाईकांची योग्य ती खात्री करून मुलीस तिच्या आईकडे सुपूर्द करण्यात आले.

अल्पवयीन व गतिमंद मुलीस पोलिसांनी सुखरूपपणे तिच्या आईच्या ताब्यात दिल्याने तिची आई व नातेवाईकांनी पनवेल तालुका पोलिसांचे आभार मानले.



## रामचंद्र म्हात्रे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन

**उरण : बातमीदार**

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचालित, रामचंद्र म्हात्रे विद्यालय ॲण्ड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स आवरे येथे बुधवारी (दि. १२) राष्ट्रीय युवा दिन संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त मेघा म्हात्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे, ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मेघा म्हात्रे, बांधकाम व्यावसायिक जमाल सिद्धिकी, नाट्य व सिनेकलावंत सुयश म्हात्रे, तसेच कॉलेजचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद केणी यांनी केले.



## स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ यांचे स्वराज्य निर्मितीत योगदान या विषयावर प्रा. एच. के. जगताप यांनी व्याख्यान दिले.

व्याख्यानात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवण्यामध्ये जिजाऊंनी त्यांना दिलेले संस्कार स्वराज्य निर्मितीत अत्यंत मोलाचे ठरल्याचे सांगितले. स्वामी विवेकानंदांचे जीवन चरित्र व त्यांचे भारतीय संस्कृतीत योगदान या विषयावर माजी प्राचार्य प्रा. के. ए. शामा यांनी मागदर्शन केले. त्यांनी विवेकानंदांचे शिकागो परिषदेतील भाषण, मॅनेजमेंट गुरू म्हणून त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व, उत्तम मनोबल याचे त्यांनी सांगितलेले महत्त्व, वैश्विक ऐक्याची संकल्पना व भारतीय संस्कृतीची महानता अशा विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी अध्यक्षीय समारोप करताना स्वामी विवेकानंद व जिजामाता यांच्या चरित्रावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. एम. जी. लोणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेलमध्ये प्रिपेड ऑटो रिक्षा बुथसाठी आवाहन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वेस्थानकावरील रेल्वे प्रशासनाने निश्चित केलेल्या जागेवर प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी, वस्तू व इतर प्राथमिक सेवा सुविधा पुरविणाऱ्या इच्छुक नोंदणीकृत सेवाभावी संस्था अथवा रिक्षा संघटनांकडून लेखी स्वरूपात होकार कळविण्याबाबतचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांनी केले आहे.

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने पनवेल रेल्वे स्टेशन व एसटी स्टँड येथे प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ सुरू करण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. त्या अनुषंगाने मध्य रेल्वे मुंबई सीएसएमटीचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात प्रिपेड ऑटो रिक्षा बुथ सुरू करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिली आहे. या प्रिपेड ऑटो रिक्षा योजनेमुळे ऑटो रिक्षा चालक, तसेच प्रवासी या दोघांनाही फायदा होणार आहे. या योजनेमुळे प्रवाशांना सुरक्षित व निश्चित दरामध्ये सेवा उपलब्ध होईल.

बुथ उभारणे, प्रिपेड सेवेसाठी संगणक, प्रिंटर, स्टेशनरी, विद्युत बिल, फोन बिल, फर्निचर, टेबल खुर्ची, पाणीपुरवठा, २४ तास सेवा देण्याकरिता किमान कर्मचारी इत्यादी प्राथमिक सेवासुविधा उपलब्ध करून प्रिपेड बुथ चालविण्याकरिता इच्छुक नोंदणीकृत सेवाभावी संस्था अथवा रिक्षा संघटनांकडून लेखी स्वरूपात होकार कळविण्याबाबतचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

## संपादकीय

# श्रेयवादाच्या पाट्या

मुंबई आणि महाराष्ट्रातील दुकानांच्या पाट्या मराठीतच असायला हव्यात या आग्रहाला आता कायद्याचे अधिष्ठान मिळाले आहे. दुकान कितीही मोठे वा छोटे असो, त्याची पाटी मराठी देवनागरी लिपीमध्येच असली पाहिजे, अशी सक्ती करणारा निर्णय राज्य सरकारने नुकताच मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला. त्यावरून आता श्रेयवादाची लढाई पेटली आहे. माध्यमांमधला सूर पाहता हे सारे नव्यानेच घडते आहे असा त्रयस्थ व्यक्तीचा समज होऊ शकतो, परंतु या निर्णयात नवीन असे काही नाही. असलेच तर किरकोळ तपशीलाच्या स्वरूपाचे आहे.

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१७ हा कायदा पूर्वीच मंजूर झाला आहे. दुकानाच्या पाट्या मराठीत असण्याबाबत निर्णय यापूर्वीच झाला होता. त्याची अंमलबजावणी कशी झाली हा संशोधनाचा विषय आहे. यापूर्वी दहापेक्षा अधिक कर्मचारीसंख्या असलेल्या दुकानांनाच मराठी पाटीचे बंधन होते. मध्यम व छोट्या दुकानांना कुठल्याही भाषेत पाटी लावण्याची मुभा होती. नव्या निर्णयात तेवढाच बदल करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील नामफलक मराठीतच असावेत हा आग्रह गेली चार दशकांहून अधिक काळ धरला जात आहे, किंबहुना शिवसेनेचा उदयच मुळी मराठीच्या मुद्द्यावर झाला होता. मराठी माणसाला केंद्रस्थानी ठेवून स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने मराठी अस्मितेचे स्फुलिंग चेतवले. त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. मुख्य म्हणजे महाराष्ट्रात मराठी भाषेच्या वापराबाबत ४०-४० वर्षे लढा द्यावा लागतो हेच मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. मराठी माणसाकडे आणि पर्यायाने मराठी भाषेकडे अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या काँग्रेसी जनांसोबत शिवसेनाच मांडीला मांडी लावून बसताना दिसते हेच ते दुर्दैव. सुमारे दहा-बारा वर्षांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठी पाट्यांचा प्रश्न हाती घेऊन धडाक्यात आंदोलन उभे केले होते. खळ्ळ खट्याकचे आवाज दुमदुमल्यानंतर अमराठी दुकानदारांनी निमूटपणाने मराठी पाट्या लावल्या. ३०-४० वर्षांत न सुटलेला प्रश्न मनसेने आपल्या पद्धतीने एका महिन्यात सोडवला. यथावकाश मराठी पाट्यांच्या आग्रहाचे कायद्यात रूपांतर झाले. शिवसेनेच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडी सरकारला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली. या दोन वर्षांत राज्यकर्त्यांना मराठी माणसाचा जणू विसर पडला होता. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका तोंडावर आल्यानंतर अचानक मराठी अस्मितेचा प्रश्न उफाळून आला. याला योगायोग कसे म्हणावे? आगामी निवडणुकांमुळेच जाग्या झालेल्या कुंभकर्णाचे अभिनंदन, अशा शेलक्या शब्दांमध्ये मनसेने महाविकास आघाडी सरकारला डिवचले हे काही उगाच नव्हे. दुकानांच्या पाट्या मराठी असण्याबाबत मनसेने जितकी आग्रही भूमिका घेतली, तेवढी आज सत्तेत असलेल्या तिन्ही पक्षांपैकी कुणीही घेतलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रामधील दुकानांच्या पाट्या मराठीत असण्याला कोणाचाच विरोध असण्याचे कारण नाही. कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल अशा बव्हंशी राज्यांमध्ये दुकानांच्या पाट्या तेथील प्रादेशिक भाषेतच ठळकपणे असाव्यात असा नियम आहे. तो कसोशीने अमलात आणला जातो. मुद्दा मराठी पाट्यांचा नसून या निर्णयाच्या टाइमिंगचा आहे. केवळ राजकीय फायद्यासाठी अशा घोषणा व निर्णय होणार असतील तर त्याला विरोध होणारच. गेल्या दोन वर्षांत कोरोना महामारीमुळे मुंबई, नवी मुंबई किंवा ठाणे येथील दुकानदारी साफ झोपली आहे. त्यांच्यावर त्यापाठोपाठ अशी सक्ती करणे म्हणजे दुष्काळात तेरावा महिना लागल्यासारखे होईल.**

# रायगडात देशी-विदेशी पाहुण्यांची सफर

हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत. त्यामुळे पक्षी निरीक्षक व पर्यटक सुखावले आहेत.

सद्यस्थितीत सुमारे २२ ते २५ हजार किलोमीटरचा प्रवास करून अमुर ससाणे रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात दाखल झाले आहेत. पक्षी अभ्यासक राम मुंडे यांना या भागात जवळपास ३० ते ३५ अमुर ससाणे दिसून आले आहेत. या भागात एमआयडीसी असल्याने येथे उंचच उंच लाईटचे टॉवर आहेत आणि या टॉवरच्या तारेवर सकाळ व संध्याकाळच्या वेळेला अमुर ससाणे थव्याने बसलेले दिसून येत होते. वाढलेल्या गवतावरील किडे, कीटक, छोटे पक्षी यांची शिकार करून आपली उपजीविका भागवणारे हे शिकारी पक्षी जवळपास पंधरा दिवस या भागात मुक्कामासाठी होते. दोन दिवसापूर्वी ते स्थलांतर करून पुढे निघून गेले आहेत. अद्यापही एखादा अमुर ससाणा या भागात दिसून येतो. याबरोबरच ऑर्च बिल्लीयड फ्लायकॅचर, ठिपकेवाला तुतारी, काळ्या डोक्याचे भारीट व हिमालयन बुलबुल व इतरही देशी व विदेशी प्रवाशी व स्थलांतरित पक्षी जिल्ह्याच्या विविध भागात दाखल झाले आहेत.

**मुबलक खाण्यासाठी प्रवास**

***पावसाळा संपला की जंगल, माळराने, शेती यामध्ये गवताची वाढ मोठ्या प्रमाणात होते. या गवतावर थंडीच्या दिवसात कीटकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. या कीटकांना खाण्यासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करून प्रवासी पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत.***

**“जंगलाला लावल्या जाणाऱ्या वनव्यांमुळे स्थलांतरित कीटक मरतात. परिणामी या पक्षांना खाद्य मिळत नाही. त्यामुळे पर्यावरणातील समतोल ढासळत चालला आहे. वणवा लावण्याचे प्रमाण कमी झाले तर आपल्या भागात भविष्यात आणखी विविध स्थलांतरित पक्षी येतील.**

**-राम मुंढे, पक्षी अभ्यासक**





**अमुर ससाणा**

अमूर ससाणा हा एक स्थलांतरित शिकारी पक्षी असून तो महिन्याभरात जवळपास २२ ते २५ हजार किलोमीटरचा प्रवास करतो. तो मुळात रशियामधल्या सायबेरिया क्षेत्रातील निवासी आहे. रशिया आणि चीन या देशांची नैसर्गिक सीमा म्हणजे अमुर नावाची नदी. या नदीच्या नावावरून या पक्षाचे नाव अमुर ससाणा असे पडले आहे. अमुर नदीच्या भागातच या पक्षाचे प्रजनन होते. परंतु नोव्हेंबर महिन्यात बर्फ पडण्याच्या अगोदर हा पक्षी आपल्या उपजीविकेसाठी प्रवास करण्यास सुरुवात करतो. तो अमुरहुन चीनमार्गे भारतात दाखल दाखल होतो. भारतात याचा मुक्काम काही महिने असतो. भारतातील विविध भागातून ते नागालँड राज्यात हजारोंच्या संख्येने एकत्र येतात आणि काही दिवस तेथे मुक्काम करून आफ्रिकेत निघून जातात. पाच दिवसात तो पाच हजार सहाशे किलोमीटरचा प्रवास करतो. एवढा प्रवास हा पक्षी कमी दिवसात कसा करू शकतो हे पक्षीतज्ज्ञांना पडलेले कोडं आहे.







**हिमालयन बुलबुल**
(Himalayan Bulbul)

मुळात हिमालयात वास्तव्यात असणारे हे पक्षी सध्या स्थलांतर करून रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत. माणगाव तालुक्यातील पाटणूस, ताम्हिणी घाटाच्या पायथ्याशी हे पक्षी सध्या थव्याने उडताना दिसून येत आहेत. थंडीच्या दिवसात हिमालयात बर्फ पडत असल्याने हे पक्षी आपल्याकडे स्थलांतरित होतात. विशिष्ट आवाजामुळे हिमालयन बुलबुल हे पक्षी लक्ष वेधून घेतात. विविध झाडांची फळे कीटक फुलांमधील मकरंद खाताना ते पक्षी निरीक्षकांना दिसून येत आहेत. संपूर्ण काळ्या रंगाचे शरीर असणाऱ्या हिमालयन बुलबुल या पक्ष्याचे पाय व चोच लाल रंगाची असते. थंडी कमी झाली की, ते पुन्हा स्थलांतर करून परतीच्या प्रवासाला लागतात.

**ऑर्च बिल्लीयड फ्लायकॅचर**
(Orche-bellied flycatcher)

हा पक्षी आकाराने अगदी लहान असतो. दाट झाडी वेली आणि करवंदीच्या जाळ्यामध्ये पाण्याच्या जवळ इतर कीटक पकडणाऱ्या पक्षांबरोबर हा सध्या दिसून येत आहे. या पक्षाला कॅमेऱ्यात कैद करणे फार कठीण काम आहे. कारण तो प्रचंड वेगाने हालचाल करत कीटक पकडणारा पक्षी आहे. हा पक्षी दक्षिण मेक्सिकोपासून अँडीजच्या पूर्वेपर्यंत दक्षिण ब्राझीलपासून त्रिनिदादपर्यंत या भागात आढळणारा पक्षी आहे.

**ठिपकेवाला तुतारी** (wood sandpiper)

ठिपकेवाला तुतारी हा पक्षी थंडीच्या दिवसात नदीच्या पात्रात पाणथळ जागेत, शेतात साठलेल्या पाण्यात जल कीटक, आळ्या, शंख-शिंपले खातांना दिसून येतो. हा पक्षी मुळात युरोपमधील सबआर्टिक आर्द्र प्रदेशातला. तो आफ्रिका, दक्षिण आशियामार्गे भारतात स्थलांतर करून येतो आणि थंडीचे दिवस संपले की, परतीच्या प्रवासाला लागतो.

**काळ्या डोक्याचे भारीट पक्षी**
(black headed bunting)

गवताळ प्रदेशात गवतावरील बीया खड्ड्यामध्ये भात झोडणीनंतर राहिलेले धान्य खाण्यासाठी काळ्या डोक्याचे भारीट हे पक्षी सध्या रायगडात दिसून येत आहेत. हिवाळ्यात पूर्व युरोप आणि पूर्व इराणहुन स्थलांतर करून येणारे हे पक्षी हजारोच्या संख्येने भारतात दाखल होतात. जवळपास सात हजार किलोमीटरचा प्रवास करून उपजीविकेसाठी ते आपल्या रायगड जिल्ह्यात दाखल झाले असल्याचे दिसून येत आहे.



**खबरबात**
**धम्मशील सावंत**

# कर्जत-कल्याण राज्यमार्गाची डागडुजी करा

- अन्यथा आंदोलन
- भाजपचा इशारा



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कर्जत-कल्याण राज्य महामार्ग अनेक ठिकाणी खराब झाला आहे. त्या रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा भारतीय जनता पक्षाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वर्षापूर्वी कर्जत-कल्याण राज्य महामार्गाचे कर्जत तालुक्यातील काम केले आहे. हा रस्ता काही ठिकाणी नादुरुस्त झाला आहे. भाजप किसान मोर्चाचे कोकण संघटक सुनिल गोगटे, भाजप तालुका सरचिटणीस संजय कराळे, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष मयूर शितोळे, भाजप सांस्कृतिक सेलचे विजय कुलकर्णी आदींनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्जत उपविभागीय अभियंत्यांची भेट घेऊन कर्जत-कल्याण राज्य महामार्गाच्या दुरुस्तीबाबत निवेदन दिले.

कर्जत-कल्याण राज्य महामार्गावर काही ठिकाणी रस्ता दुरुस्तीची कामे केली जात आहेत. मात्र जिथे काँक्रीटचा रस्ता आहे, तिथे डांबराने खड्डे बुजवले जात आहेत. डांबर आणि काँक्रीट हे व्यवस्थित चिकटत नाही काही दिवसातच पुन्हा त्यावर खड्डे पडतील.

या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित लक्ष घालून ठेकेदाराकडून योग्य पद्धतीत काम करून घ्यावे, अन्यथा भारतीय जनता पक्ष याविरुद्ध रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असे निवेदनात म्हटले आहे.

## 'सुदर्शन'तर्फे महाडमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

येथील एमआयडीसीमधील नामांकित सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्या वतीने भोराव प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कंपनीचे सुनिल साळुंखे, श्रध्दा भागवत, आकले ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनंत तांबे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक तांबे, ग्रामपंचायत सदस्या स्मिता तांबे, संजय तांबे, संजीवन तांबे, दिप्ती धोत्रे, बालाजी गुबनरे, आकले शाळेचे मुख्याध्यापक श्रीनिवास सूर्यवंशी, विषयशिक्षिका पूजा शहा, उपशिक्षिका रोहिणी पवार यांच्यासह विद्यार्थी व पालक यावेळी उपस्थित होते. बालाजी गुबनरे यांनी आभार मानले.



(छाया : महेश शिंदे)

## आरोग्य प्रहर

### वजन कमी करायचंय?

कामाचे स्वरूप व बदलत्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणाची समस्या सामान्य आहे. यासाठी अनेकांकडून आपला 'डायट प्लॅन' आखला जात असतो. महागडे उपचार तसेच व्यायाम आदी विविध माध्यमातून वाढत्या वजनाला नियंत्रित केले जाते, परंतु आपल्या स्वयंपाक घरात सहज उपलब्ध होणारे काही घटक या समस्या सोडविण्यासाठी फायद्याचे ठरू शकतात.

लठ्ठपणाच्या समस्येने आपण सर्वच कमी अधिक प्रमाणात त्रस्त आहोत. खासकरून तरुणींमध्ये याबाबत फार सजगता असते. वजन कमी करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करण्यात येतो. जीम, खानपान पद्धती, डायट चार्ट आदींवर विशेष भर देण्यात येत असतो. यासाठी वेळप्रसंगी अतिरिक्त शुल्क देऊन व्यावसायिकांकडे जाऊन वजन घटवण्यासाठी उपचार घेतले जात असतात. वजन घटवण्याचा विषय निघाल्यावर सर्वात आधी आपणास नजरेस पडते ते दिवसभरात आपण घेत असलेला आहार व त्यातून शरीराला मिळत असलेल्या कॅलरीज. (Calories) साधारणतः कॅलरीज आणि वजन (weight) या दोन्ही बाबी एकमेकांसाठी व्यस्त प्रमाणात अशा आहेत.



**पालक :** पालेभाज्यांमध्ये पालक ही भाजी सहज उपलब्ध होणारी आहे. १०० ग्रॅम पालकमधून साधारणतः २३ कॅलरीज आपणास मिळू शकतात. एका अभ्यासानुसार, एखाद्या महिलेने रोजच्या आपल्या आहारात केवळ पाच ग्रॅम पालकचा जरी समावेश केला तरी त्यातून ४३ टक्के चांगल्या पद्धतीने वजन कमी करण्यासाठी उपयुक्त ठरत असते. पालक एक हंगामी असल्याने ती सहजपणे उपलब्ध आहे.

**पपई :** प्रत्येक १०० ग्रॅम पपईमागे आपणास ४३ कॅलरीज मिळतात. पपईचा औषधी गुणधर्म असल्याने तिचा वापरदेखील बऱ्याच कारणांसाठी होत असतो. यात कमी कॅलरीज असल्याने हे तुम्हाला वजन कमी करण्यासाठी फायद्याचे ठरू शकते. शिवाय पपई सर्व ठिकाणी केव्हाही सहज उपलब्ध असल्याने रोजच्या आहारात तिचा वापर करता येऊ शकतो. पपईत फायबरचे प्रमाणदेखील चांगले असल्याने पाचक असून भुकेला शमवण्याचे कामही चांगल्या पद्धतीने होते.

**बीट :** हे अत्यंत गुणकारी व महत्त्वपूर्ण घटक आहे. प्रत्येक १०० ग्रॅम बीटमागे आपणास ४३ कॅलरीज मिळू शकतात. लाल रंग असलेल्या बीटमध्ये मोठ्या प्रमाणात अँन्टीऑक्सिडेन्ट असतात. बीटचा वापर विविध औषधी घटक म्हणूनही करता येतो.

**मशरूम :** प्रती १०० ग्रॅममध्ये २२ कॅलरीज मिळत असलेले मशरूम हे 'व्हिटामीन डी'ने परिपूर्ण आहेत. मशरूम हे केवळ वजन घटवण्यासाठीच नव्हे, तर मानसिक संतुलन, प्रतिकारशक्ती वाढवणे, कर्करोगापासून बचाव करणे आदी विविध आजारांवरदेखील वरदान ठरु शकतात.

## 'अंनिस'कडून पेणमध्ये प्रबोधन

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेतर्फे बचतगटाच्या महिलांसाठी पेण येथील गांधी मंदिर वाचनालयाच्या सभागृहात खोट्या प्रतिष्ठेचे बळी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. 'अंनिस'च्या राज्य महिला विभागाच्या सदस्या मीना मोरे यांनी या वेळी मार्गदर्शन केले.

स्त्रियांनी आर्थिक, मानसिकदृष्ट्या सक्षम होऊन अन्यायाविरुद्ध लढायला हवे, असे विचार मीना मोरे यांनी या वेळी मांडले, तसेच आपले नैराश्य दूर करण्यासाठी 'अंनिस'च्या मानसमित्र उपक्रमाचा आधार घेण्याचे आवाहन करण्यात आले. 'अंनिस'च्या पेण शाखेचे संदेश गायकवाड, लोकरे, प्रा. पोरे आणि चंद्रहास पाटील यांनीही मार्गदर्शन केले. आरडीसीसी शाखा व्यवस्थापक विद्या राऊत आणि बचतगटातील महिलांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

# गोळेगणी येथे आंबापीक शेतीशाळा

## होण्डा कंपनीतर्फे यांत्रिकीकरणाचे सादरीकरण



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कृषी विभाग यांच्या वतीने आत्मा योजनेंतर्गत पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे आंबा पीक शेतीशाळा घेण्यात आली. त्याला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शेतीशाळेत होंडा कंपनीच्या शेतीविषयक विविध उपकरणांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करून अनुदानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

पोलादपूर तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शेतीशाळेचे प्रास्ताविक कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी केले. मजुरांच्या टंचाईवर आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून शेती करणे काळाची गरज असल्याचे सुरज पाटील यांनी सांगितले.

कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी आंबा लागवड, छाटणी, आंबा मोहर संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले. होंडा कंपनीचे प्रतिनिधी निखील पोहरे यांनी कंपनीच्या उत्पादनांची माहिती देऊन प्रात्यक्षिके सादर केली.

होंडा कंपनीचे अधिकृत विक्रेते राहुल गोडसे, सरपंच नितीन मोरे, नामदेव येरुणकर, शेखर येरूणकर, ज्ञानेश्वर मोरे, प्रकाश दळवी, बाळकृष्ण मोरे, सागर मोरे, प्रवीण महाडिक, राजेंद्र दळवी, सुरेशराव मोरे आदी यावेळी उपस्थित होते. अनिल डासाळकर यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत मोरे, अनिरुद्ध येरुणकर, संजय मोरे, प्रसाद पवार, विनोद मोरे, विकास येरुणकर, अविनाश येरुणकर, दीपक सुर्वे, दीपक कदम यांनी सहकार्य केले.

## ग्रामविकास अधिकारी रघुनाथ म्हात्रे सेवानिवृत्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी रघुनाथ नारायण म्हात्रे सेवानिवृत्त झाले. ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला.

रघुनाथ म्हात्रे १९८५ साली ग्रामविकास खात्यामध्ये नोकरीला लागले. त्यांनी ग्रामसेवक म्हणून माणगाव तालुक्यातील मांजरोणे, त्यानंतर खालापूर तालुक्यातील वावर्ले, बोरगाव, वरोसे, माडप, माजगाव, इसांबे, सावरोली, कुंभीवली येथील ग्रामपंचायतीमध्ये काम केले. त्यानंतर त्यांनी अलिबाग तालुक्यातील खंडाळे व वेश्वी या ठिकाणी ग्रामविकास अधिकारी म्हणून काम केले. त्यांच्या कामाची दखल घेत रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देण्यात आला आहे. या खात्यातील ३६ वर्षांच्या सेवेनंतर ते निवृत्त झाले.

अलिबाग पंचायत समितीच्यावतीने रघुनाथ म्हात्रे यांना निरोप देण्यात आला. यावेळी जि. प. ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी डी. एल. साळावकर, विस्तार अधिकारी डी. बी. राठोड, ग्रामसेवक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष एन. टी. म्हात्रे, अलिबाग तालुका अध्यक्ष नितेश तेलगे आदी उपस्थित होते.

# लोखंडी प्लेट तुटल्याने बंधाऱ्यातील पाणी गेले वाहून

## कर्जत बोरगाव येथील शेतकरी हवालदिल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील पोश्री नदीवरील बोरगाव येथे याच वर्षी बांधलेल्या सिमेंट बंधाऱ्यात भरपूर पाणी साठले होते, मात्र त्यासाठी लावलेल्या लोखंडी प्लेट गुरुवारी (दि. १३) रात्री तुटल्या आणि बंधाऱ्यातील सर्व पाणी वाहून गेले. या बंधाऱ्याच्या पाण्यावर किमान ५० एकर जमिनीवर भाजीपाला शेती केली आहे. त्या शेतीसाठी आता पाणी कुठून आणायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

कर्जत तालुक्यातील बोरगाव येथे पोश्री नदीवर जलसंधारण विभागाने २०२१मध्ये ७३ लाख रुपये खर्च करून ८३ मीटर लांबीचा सिमेंट बंधारा उभारला होता.


(छाया : संतोष पेरणे)

त्या बंधाऱ्यात मुबलक पाणीसाठा झाल्यामुळे बोरगावातील ३० शेतकऱ्यांनी पाच एकर जमिनीवर भाजीपाला लावण्यास सुरुवात केली असून, त्यासाठी कृषिपंप लावून सिमेंट बंधाऱ्यातील पाणी नेण्याची तजवीज केली आहे. मात्र गुरुवारी रात्री अचानक त्या बंधाऱ्यात असलेल्या चार पैकी एका लोखंडी प्लेटमधून पाणीगळती सुरु झाली आणि शुक्रवार सकाळपर्यंत बंधाऱ्यातील सर्व पाणी वाहून गेले आहे. या बंधाऱ्यात आता पाणीच शिल्लक राहिले नाही. त्यामुळे लागवड केलेला भाजीपाला कसा जगावयाचा हा प्रश्न निर्माण झाला आहे.

बंधाऱ्याला लावलेल्या लोखंडी प्लेट जुन्या होत्या. पाण्याच्या दाबामुळे त्यातील एक प्लेट तुटून बंधाऱ्यात साठलेले पाणी वाहून गेले, असा आरोप शेतकरी करीत आहेत.

दरम्यान, सिमेंट बंधाऱ्यातील लोखंडी प्लेट तुटल्याने पाणी वाहून गेल्याची माहिती मिळताच जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी बोरगाव येथे जाऊन बंधाऱ्याची पाहणी केली.

पोश्री नदीमध्ये सध्या थोड्याफार प्रमाणात पाणी वाहत आहे. तुटलेल्या लोखंडी प्लेट बदलून बोरगाव बंधाऱ्यात पुन्हा पाणीसाठा होईल का? याची माहिती जलसंधारण विभाग घेत आहे.

> **सिमेंट बंधाऱ्यातील पाण्यावर भाजीपाला शेती करून उदरनिर्वाह होईल, म्हणून गेली दोन महिने आम्ही मेहनत करतोय. आता शेतात रोपेही दिसू लागली आहेत. मात्र बंधाऱ्यातील पाणी वाहून गेले आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे.**
> **–राकेश यशवंत खडेकर, शेतकरी, बोरगाव, ता. कर्जत**

> **बंधाऱ्याच्या चारपैकी एका दरवाजाच्या लोखंडी प्लेट अज्ञात व्यक्तीने वाकवल्यामुळे साठलेले पाणी वाहून गेले आहे. याबाबत आम्ही पोलिसात तक्रार करणार आहोत. मात्र शेतकऱ्यांना पाणी कसे देता येईल, याचा विचार प्राधान्याने करीत आहोत.**
> **–दिलीप नलावडे, उपअभियंता, जलसंधारण विभाग, कर्जत**


(छाया : विनायक माडपे)

# एक्स्प्रेस वेवरून टँकर कोसळला

## दोन जण किरकोळ जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

ब्रेक निकामी झाल्यामुळे मुबंई–पुणे एक्सप्रेस वेवरून जाणारा टँकर शुक्रवारी (दि. १४) पहाटेच्या सुमारास ५० फूट खाली जुन्या महामार्गावर कोसळला. सुदैवाने यातील चालक आणि क्लिनर बचावले असून, ते किरकोळ जखमी झाले आहेत.

पुण्याहून मुबंईकडे चाललेला टँकर बोरघाटातील दत्तवाडीजवळ आला असता त्याचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे टँकर एक्सप्रेस वेवरून ५० फूट खाली कोसळला. हा टँकर रिकामा असल्याने जीवित हानी झाली नाही. टँकरमधील चालक आणि क्लिनर किरकोळ जखमी झाले आहे.

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी टँकरमध्ये अडकलेल्या चालक आणि क्लिनर यांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले.

# सुधागडात कडधान्य पिकाला साड्यांच्या कुंपणाचे संरक्षण

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात बहुतांश ठिकाणी कडधान्याची शेती केली जाते. या कडधान्य पिकाचे शेळी व गुरांपासून संरक्षण करण्यासाठी काही शेतकरी आपल्या शेताला साड्यांचे कुंपण करत आहेत. पाली–खोपोली मार्गाच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात साड्यांचे कुंपण लावलेली शेती आढळते.

पक्क्या भिंतीचे किंवा लोखंडी जाळी व तारांचे कुंपण करणे परवडत नसल्याने सर्वसाधारणपणे शेतकरी आपल्या शेताला करवंदाची जाळी, काटेरी पेरकूट, किंवा काट्याकुट्यांचे कुंपण करतात. मात्र रानमोडीने करवंदाच्या जाळ्यांचे नुकसान केले आहे. पेरकूट व काट्याकुट्यादेखील कमी प्रमाणात मिळतात. त्यामुळे शेताच्या कुंपणासाठी घरातील जुन्या साड्या वापरल्या जातात, असे एका शेतकऱ्याने सांगितले. जुन्या साड्यांचे कुंपण तयार करण्यास सोपे, कमी खर्चिक व कमी श्रमाचे असल्याने सुधागड तालुक्याती अनेक शेतकरी अशा कुंपणाला पसंती देत आहेत. त्यामुळे कडधान्य पिकांचे गुरे व शेळ्यांपासून संरक्षण होते, असे शेतकरी मनीष पाटील यांनी सांगितले. तालुक्यातील गरीब व आदिवासी शेतकऱ्यांसाठी हे जुन्या साड्यांचे कुंपण वरदान ठरत आहे.


(छाया : धम्मशील सावंत)

# फणसाडमधील वणवे रोखण्यासाठी विहूर ग्रामस्थांचे श्रमदान

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील फणसाड अभयारण्य आगीपासून संरक्षित रहावे, यासाठी विहूर ग्रामस्थांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान करुन जंगल परिसरात वाढलेली झुडपे, सुके गवत, झाडाच्या सुक्या फांद्या, पालापाचोळा गोळा करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावली.

फणसाड अभयारण्य आगीपासून संरक्षीत रहावे, अभयारण्यातील वृक्ष, वन्यजीव, पक्षी यांचे अस्तित्व व सुरक्षितता टिकून रहावी यासाठी अभयारण्याचे वन परिक्षेत्र अधिकारी राजवर्धन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवले जातात. या भागातील कधीही आग लागू नये यासाठी जनजागृती, जाळीत रेषा काढणे अथवा सुकी झाडीझुडपे, गवत काढण्यासाठी लोकसहकार्यातून या ठिकाणी काम केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी राजवर्धन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अरुण पाटील यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने विहूर धरण ते नवाबांचा राजवाडा या परिसरातील जंगलात वाढलेली झाडी–झुडपे, सुके गवत, झाडाच्या सुक्या फांद्या, सुका पालापाचोळा गोळा केला व त्याची योग्य ती विल्हेवाट लावली.

यासाठी विहूर गाव अध्यक्ष महेंद्र कदम यांनी गावातील १३० माणसे उपलब्ध करून दिली. त्यांनी श्रमदान करून फणसाड अभयारण्याला सुरक्षितता प्रदान करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली. अभयारण्याचे कर्मचारी महेश माने, ज्ञानदेव सुभेदार, ज्ञानेश्वर कांबळे या श्रमदानात सहभागी झाले होते.

> **फणसाड अभयारण्य क्षेत्रात वणवा लागू नये, जंगलातील सुके गवत व लाकडे एकत्र करणे गरजेचे होते. त्यासाठी विहूर ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिल्यामुळे अभयारण्य क्षेत्र वणव्यापासून सुरक्षित राहणार आहे. विहूर ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे मोठे क्षेत्र वनव्यापासून सुरक्षित करण्यात यश आले आहे.**
> **–अरुण पाटील, वनरक्षक, फणसाड अभयारण्य, ता. मुरुड**

(छाया : संजय करडे)


# माणगावमध्ये एका दिवसात ८३ रुग्ण

**माणगाव : प्रतिनिधी**

मागील दोन ते तीन महिन्यापासून कोरोना प्रादुर्भाव हळूहळू कमी होत होता. पण नवीन वर्षाच्या सुरुवातीपासून कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. माणगाव तालुक्यात गुरुवारी (दि. १३) सायंकाळी ५ वाजेपर्यंत ८३ नवीन कोरोना रुग्ण आढळले. तालुक्यात एकूण २५९ रुग्ण कोरना बाधित असून, १४ रुग्ण बरे झाले आहेत.

# श्रीवर्धन नगर परिषदेचा अजब कारभार

## भिंतीवर काढण्याचे चित्र चक्क पारावर रेखाटले; नागरिकांमध्ये चर्चा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त काही सन्मानचिन्ह काढून त्याची जाहिरात करण्याचे आदेश नगरविकास खात्याकडून देण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी करताना श्रीवर्धन नगर परिषदेने सन्मानचिन्हाचे चित्र भिंतीवर काढण्याऐवजी चक्क पाय सोडून बसण्याच्या पारावर रेखाटले आहे.

स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे स्वच्छता सर्वेक्षण अभियानही सुरू आहे. त्या निमित्ताने काही सन्मानचिन्ह काढून त्याची जाहिरात करण्याचे आदेश नगरविकास खात्याकडून राज्यातील नगरपंचायती व नगर परिषदांना दिले आहेत.

श्रीवर्धन शहरातील दिवेआगर आणि जीवना बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यावर भलेमोठे पिंपळाचे झाड असून त्याच्या सभोवती गोल पार बांधला आहे. काही प्रवासी या पारावर पाय सोडून बसलेले असतात. श्रीवर्धन नगर परिषदेतर्फे या पारावर चित्र रेखाटण्यात आले आहे. त्यात सन्मान चिन्हावर तिरंग्यामध्ये असल्याप्रमाणे हिरवा, पांढरा, भगवा रंग आहे. त्याचप्रमाणे अशोक चक्रदेखील काढण्यात आले आहे.

चित्र रंगवण्याचे काम सुरू असताना पत्रकार संतोष चौकर यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती. चित्र भिंतीवर काढण्यास कोणतीही हरकत नाही, परंतु बसण्याच्या जागी हे चित्र काढल्यानंतर त्यावरती कोणी अनवधानाने बसल्यास त्या चिन्हाचा अवमान होण्याचे शक्यता नाकारता येत नाही, पण श्रीवर्धन नगर परिषद प्रशासनाने या पारावर हे चित्र रंगवून पूर्ण केले आहे. याबाबत नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे.

(छाया : भारत चोगले)



पनवेल महानगरपालिका

शुद्धीपत्रक

**कामाचे नाव :– पनवेल महानगरपालिकेकरिता स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत Project Implementation Unit तयार करणेबाबत.**

**निविदा क्र. :–** Tender ID - 2022_PMC_754459_1.

पनवेल महानगरपालिकेकरिता स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत Project Implementation Unit तयार करणेकामी प्रसिद्ध केलेल्या फेर निविदेस (२री वेळ) स्पर्धात्मक निविदा प्राप्त होणेकरिता सदर निविदेस मुदतवाढ देण्यात येत आहे.

| | Tender existing dates | Tender extention dates |
|---|---|---|
| Document Download End Date | 14/01/2022 | 20/01/2022 |
| Bid Submission End Date | 14/01/2022 | 20/01/2022 |
| Bid Opening Date | 17/01/2022 | 21/01/2022 |

जा.क्र. पमपा/घकवि/२५२२/प्र.क्र.–३८२/३३/२०२२
दिनांक :– १४/०१/२०२२

सही/–
(सचिन पवार)
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका


# कर्जत नगर परिषदेच्या कचरा डब्यांची दुर्दशा

## स्वच्छतादूतांचे आरोग्य धोक्यात



**कर्जत : बातमीदार**

नगर परिषदेच्या घंटागाडीत ज्या डब्यांमधून कचरा टाकला जातो, त्या डब्यांची डब्यांची दुरावस्था झाली आहे. कड्या तुटल्यामुळे स्वच्छता दुतांना ते डब्बे आपल्या डोक्यावर उचलून घेऊन त्यातील कचरा घंटागाडीत टाकावा लागतो. अनेकदा त्यातील कचरा अंगावर पडत असल्याने स्वच्छता दुतांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेमुळे राज्यात अनेक निर्बंध लावण्यात आले आहेत. मात्र कर्जत नगर परिषदेतील स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षामुळे स्वच्छता दूतांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ते टाळण्यासाठी कर्जत नगर परिषदेने नवीन कचरा डबे उपलब्ध करून घ्यावेत, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता प्रभाकर गंगावणे यांनी केली आहे.


महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

पिनकोड–४१०२०६

E-mail- panvel.ee@mahapwd.com

दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ७१ (ई-निविदा) सन २०२१-२२**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२– २७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरिता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप** – या निविदेमध्ये एकूण १३ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १७.०१.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक ३१.०१.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/१११**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक :– १०/०१/२०२२**

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, पनवेल**


# सुराज्य प्रतिष्ठानचा वर्धापन दिन उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**



सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान या संघटनेचा पाचवा वर्धापन दिन बुधवारी (दि. १२) रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात कोरोनाविषयक नियम पाळून साजरा करण्यात आला. या वेळी जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते सुराज्यच्या वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले.

राज्य शासनाने घाईघाईने पारित केलेला विद्यापीठ कायदा हा पुढच्या पिढीला घातक ठरू शकतो, म्हणून तरुणांनी पुढे येऊन राज्य सरकारला जाब विचारला पाहिजे, या कायद्याविरोधात आवाज उठवला पाहिजे, असे प्रतिपादन भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातील अनाथांची माय सिंधूताई सपकाळ यांना आदरांजली वाहण्यात आली. रोशन चाफेकर यांनी प्रास्ताविकात सुराज्यच्या पाच वर्षाच्या कार्याचा आढाव घेतला. पत्रकार राजेंद्र जाधव यांनी आई आणि गाईचे महत्व सांगत त्यांचा सांभाळ करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जागृती खेरटकर व तुषार दिघे यांनी केले. रोहा सिटीझन फोरमचे अध्यक्ष प्रदिप उर्फ आप्पा देशमुख, प्रतिष्ठानचे रोहा तालुका अध्यक्ष सुमित खरात, शहर अध्यक्ष वेदांत देशमुख, उपाध्यक्ष अभिजीत भोसले, सचिव हाजी कोठारी, सहसचिव विनीत वाकडे, आदर्श शिक्षक नंदकुमार मरवडे, सचिन साळुंखे, महेश मोहिते, विजय खेरटकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-27/ 7000021864 | Work of Supply & installation of EHV transformer cooling Fan at various substation under EHV (O&M) Circle, Panvel | Rs. 10.99 Lakhs |
| Tend-28/ 7000021919 | AMC for the work of maintenance of battery and battery chargers at various substations under EHV (O&M) Circle, Panvel | Rs. 25 Lakhs |
| Tend-30/ 7000021938 | Work of Supply & installation of 36KV Galvanized CT at various substation under EHV (O&M) Circle, Panvel | Rs 99.67 Lakhs |
| Tend-31/ 7000021947 | Supply 18KV and 30kV Lightening Arrestors under EHV (O&M) Circle Panvel | Rs 15.50 lakhs |

EMD 1% of estimated cost of each tender & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 14.01.2022 to 21.01.2022 up to 23.59 hrs, Opening date:-22.01.2022**. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm.) Tel. No. 022-27459625. Mob No 9167026141

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# पुण्याकडून मुंबईचा धुव्वा

## प्रो कबड्डी लीग



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगमध्ये पुणेरी पलटणने यू मुंबाला ४२-२३ अशा फरकाने पराभूत केले. पुणेरी पलटणचा नऊ सामन्यांमधील हा चौथा विजय असून गुणतालिकेत ते दहाव्या स्थानावर आहेत, तर यू मुंबा संघ नऊ सामन्यांनंतर तीन विजय आणि तीन पराभवांसह पाचव्या स्थानावर आहे.

पूर्वार्धानंतर पुणेरी पलटणने सामन्यात १८-१० अशी चांगली आघाडी घेतली. पुण्याचा कर्णधार नितीन तोमरने उत्कृष्ट कामगिरी केली, तर त्याला बचावात दोन टॅकल पॉइंट्सही मिळाले. याशिवाय अस्लम इनामदार आणि मोहित गोयत यांनी प्रत्येकी तीन गुण घेतले.

पहिल्या सत्रात यू मुंबाचे अभिषेक सिंग आणि रिंकू फ्लॉप ठरले. २४व्या मिनिटाला मुंबई संघ दुसऱ्यांदा सामन्यात ऑलआऊट झाल्याने त्यांचे सामन्यात पुनरागमन अशक्य झाले. ३२व्या मिनिटाला मुंबई पुन्हा एकदा ऑलआऊट झाला आणि पुणेरी पलटणने २० गुणांची आघाडी घेतली. नितीन तोमरनेही सामना संपण्यापूर्वी बचावातील हाय ५ पूर्ण केला आणि त्याने सामन्यात चार रेड पॉइंट्ससह एकूण नऊ गुण मिळवले. अस्लम इनामदारने सामन्यात सात गुण घेतले.

तत्पूर्वी पहिल्या सामन्यात गतविजेत्या बंगाल वॉरियर्सने तमिळ थलायवाजचा ३७-२८ असा पराभव करीत चौथा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत नवव्या स्थानावर झेप घेतली. तामिळ थलायवाज संघ नऊ सामन्यांनंतर २७ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. बंगाल वॉरियर्सचा कर्णधार मनिंदर सिंगने चमकदार कामगिरी करीत सामन्यात १२ रेडिंग पॉइंट घेतले.

बंगालने पहिल्या हाफनंतर २०-१६ अशी आघाडी घेतली. तामिळ थलायवाजचा कर्णधार सुरजीतने पहिल्या हाफमध्ये बचावात हाय ५ मिळवून चांगली कामगिरी केली होती, परंतु १३व्या मिनिटाला तो संघाला ऑलआऊट होण्यापासून रोखू शकला नाही. ऑलआऊट झाल्यामुळे तमिळ संघ पूर्वार्धात पिछाडीवर पडला. बंगालसाठी मनिंदर सिंगशिवाय अमित नरवालने बचावात चमकदार कामगिरी करीत हाय ५ पूर्ण केले, तर रण सिंगनेही बचावात चांगली कामगिरी करताना चार गुण मिळवले.

## भारताविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीसह मालिकाही द. आफ्रिकेने जिंकली

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

तिसरा आणि शेवटचा निर्णायक कसोटी सामना दक्षिण आफ्रिकेने सात गडी राखून जिंकला. भारताने दक्षिण अफ्रिकेसमोर विजयासाठी २१२ धावांचे माफक आव्हान ठेवले होते. हे आव्हान दक्षिण अफ्रिकेने तीन गडी गमवून पूर्ण केले. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने मालिका २-१ ने जिंकली आहे.

भारताने कसोटी मालिकेतील पहिला सामना जिंकला होता. त्यानंतर जोरदार कमबॅक करीत दक्षिण अफ्रिकेने सलग दोन सामने जिंकले. त्यामुळे विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील संघाचे दक्षिण आफ्रिकेत कसोटी मालिका जिंकण्याचे स्वप्न भंगले आहे. पहिल्या डावात भारताने सर्व गडी गमवून २२३ धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने संघाने सर्वबाद २१० धावा केल्या. भारताला १३ धावांची आघाडी मिळाली, मात्र भारताने दुसऱ्या डावात १९८ धावा केल्या आणि दक्षिण अफ्रिकेसमोर विजयासाठी २१२ धावांचे आव्हान ठेवले होते. ते यजमानांनी चौथ्या दिवशीच पार केले.

## सायना नेहवालला नमविणाऱ्या मालविकावर अभिनंदनाचा वर्षाव

**नागपूर : प्रतिनिधी**

भारताची फुलराणी म्हणून ओळखली जाणारी सायना नेहवाल इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेत दुसऱ्याच फेरीत गारद झाली. तिला गारद करणारी दुसरी तिसरी कोणी नसून मराठमोळी मालविका बनसोड आहे. सायनाला पराभूत करणारी मालविका ही पी. व्ही. सिंधूनंतरची दुसरीच भारतीय बॅडमिंटनपटू आहे.



लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावणाऱ्या आणि इंडिया ओपनची माजी विजेती सायना नेहवालचा मालविका बनसोडने २१-१७, २१-९ असा सरळ गेममध्ये पराभव केला. विशेष म्हणजे मालविकाने सायनाचे स्पर्धेतील आव्हान फक्त ३५ मिनिटातच संपवले. या जबरदस्त विजयाबद्दल मालविकावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मूळची नागपूरमधील रहिवासी मालविका रायपूरमध्ये सराव करते. ती २०११पासून बॅडमिंटन खेळते. मालविका बॅडमिंटनबरोबरच आपल्या अभ्यासावरही तेवढचे लक्ष केंद्रीत केले. तिने दहावी आणि बारावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. याचदरम्यान तिने सात आंतरराष्ट्रीय पदके जिंकली होती.

## विश्वनाथ ठाकूर यांनी जिंकली तीन सुवर्णपदके



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अकोला येथे झालेल्या ४२व्या राज्यस्तरीय स्पर्धेत सामग्री संघटन मुंबई इंडियन नेव्हीमध्ये काम करणाऱ्या विश्वनाथ हरी ठाकूर यांनी तीन सुवर्णपदके जिंकली. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विश्वनाथ ठाकूर यांनी गोळाफेक व थाळीफेक स्पर्धेत एकूण तीन सुवर्णपदके पटकाविली. याआधीही त्यांनी नेपाळ येथे झालेल्या थाळीफेक स्पर्धेत सुवर्ण, पुणे भोसरीत थाळीफेक, हातोडाफेक, गोळाफेकमध्ये सुवर्ण, नाशिक पंचवटी येथे गोळाफेकमध्ये कांस्य, पुणे इंदापूर येथे थाळीफेक व गोळाफेकमध्ये सुवर्ण, तर भालाफेकमध्ये रौप्य, मुंबई गोरेगाव येथे थाळीफेक व गोळाफेकमध्ये सुवर्ण, तर भालाफेकमध्ये रौप्य, बोईसर कांदिवली येथे स्पर्धेत थाळीफेक व गोळाफेकमध्ये सुवर्णपदक जिंकलेले आहे.

नवीन वर्षाची सुरुवातही पाटील यांनी झोकात केली. त्यांची हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नोवाक जोकोविचचा व्हिसा पुन्हा रद्द

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन ओपनपूर्वी नोवाक जोकोविच आणि ऑस्ट्रेलियन सरकार यांच्यात रंगलेला सामना काही संपण्याचे नाव घेत नाही. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेसाठी रवाना झाल्यानंतर पासपोर्ट विभागाने जोकोविचला विमानतळावर अडवले. त्याचा व्हिसा ताब्यात घेतला. या सर्व प्रकरणात जोकोविचने कोर्टात धाव घेतली तिथे तो जिंकलाही. आता पुन्हा जोकोविचचा व्हिसा रद्द करण्यात आला आहे. जोकोविच यावर काय भूमिका घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



टेनिस जगतात अव्वलस्थानी असलेल्या जोकोविचचा व्हिसा रद्द करण्याची ही दुसरी वेळ आहे. त्याने कोरोना प्रतिबंधक लस घेतलेली नाही. त्यामुळे त्याला प्रवेश देणे धोकादायक असल्याचे स्पष्टीकरण देत ऑस्ट्रेलियन सरकारने त्याला प्रवेश नाकारला आहे. सोमावारी न्यायालयाने जोकोविचच्या बाजूने निकाल देत त्याची इमिग्रेशन डीटेंशनमधून सुटका करण्यासह व्हिसा परत करण्याचा आदेश दिला होता.

या निकालानंतर ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत खेळण्याची आशा कायम असल्याची प्रतिक्रिया त्याने दिली होती, पण ऑस्ट्रेलियन सरकारने कठोर पावले उचलत नियम म्हणजे नियम हा फॉर्म्युला वापरत जोकोविचचा व्हिसा पुन्हा रद्द केला. जोकोविचसाठी हा मोठा धक्का आहे. व्हिसा रद्द झाल्यानंतर त्याच्यावर ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत खेळण्यासंदर्भातही तीन वर्षांच्या बंदीचा सामना करावा लागू शकतो. स्थानिक न्यायालयाने जोकोविचच्या बाजूने निर्णय दिल्यानंतरही ऑस्ट्रेलियन इमिग्रेशन मंत्री एलेक्स हॉके यांनी न्यायालयीन निकालाला आव्हान देण्याचा अधिकार असल्याचे म्हटले होते. आणि त्यांनी याबाबत निर्णय घेतला.





**पनवेल : काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत यांचे वडील स्व. तुकाराम नारायण घरत यांच्या सातव्या पुण्यतिथीनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घरत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी जाऊन अभिवादन केले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सरचिटणीस अंकुश ठाकूर, कोळी समाज तालुका अध्यक्ष उत्तम कोळी, भाऊ भोईर, किशोर पाटील, शुभांगी महेंद्र घरत, कुणाल घरत, राम हरी म्हात्रे, श्रीधर भगत, अश्विनी नाईक यांच्यासह घरत कुटुंबीय उपस्थित होते.**
(छाया : लक्ष्मण ठाकूर)



**पनवेल : मकरसंक्रांती सण शुक्रवारी साजरा झाला. यानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय निरीक्षक आर. पी. ठाकूर, पीआरओ बी. डी. कारंडे यांच्यासह मान्यवरांनी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी संतोष गुजर, एम. आर. पाटील उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप ओबीसी सेल तालुका उपाध्यक्ष शांताराम पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेष ढवळे, नेवाळी ग्रामपंचायतीचे सदस्य राजेश काथारा, युवा मोर्चाचे तालुका चिटणीस ओमकार पाटील, शिवकरचे माजी सरपंच मारुती पाटील, दत्ता राजे उपस्थित होते.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com